## अर्ज पोहोच

आपला दिनांक 14/02/2024 चा अर्ज प्राप्त झाला.

(१) अर्ज प्राप्त झाल्याची तारीख 14/02/2024

(२) क्रमांक 1684

सही

नाव :

एक खिडकी योजना

शाखा :- 1684

पूर्तता दिनांक :-

स्वागत कक्ष अधिकारी

प्रति,

श्री./श्रीमती निखील वागळे

पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

शा.फो.झि.मु.,पुणे-के/२२७-२(१०० पु.)-११-२०२३

Scanned with ACE Scanner

प्रति,
मानानिय पोलीस आयुक्त,पुणे

**विषय- निर्भय बनो व इतर अनेक संघटना यांनी आयोजित कार्यक्रमासाठी जातांना मला व माझ्या सहकाऱ्यांवर जीवे मारण्यासाठी हमला करणाऱ्या पुणे भाजपच्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, अभाविप व्ही पतीत पावन संघटन चे काही कार्यकर्ते यांच्या विरोधात भादवि कलम 307 व इतर कलमांच्या नुसार गुन्हा नोंदऊन त्यांना अटक करावी यासाठी फौजदारी तक्रार.**

महोदय,

दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी सहा वाजता निळू फुले सभागृह, राष्ट्र सेवा दल, सिंहगड रस्ता, पुणे येथे 'लढा लोकशाहीचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा' या शीर्षकाची एक सभा आयोजित केली गेली होती. सभेचे आयोजन 'निर्भय बनो' या जनचळवळीसह अनेक संस्था संघटनांनी एकत्रितपणे केले होते. त्या सगळया संघटनांची यादी पोलिसांच्या कडे दिलेली होती.

वरील कार्यक्रम खाजगी सभागृहात व बंदिस्त हॉल मध्ये असूनही माझे सहकारी उत्पल चंदावार यांनी सभेची माहिती पर्वती पोलीस स्टेशन मध्ये दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी दिली होती व त्याची पोच आमच्याकडे आहे. पोलिसांनी काही बंधने सभेसाठी घालत असल्याचे पत्र सुद्धा आम्हाला दिले. ज्याअर्थी प्रक्षोभक बोलू नये इत्यादी अटी घातल्या जातात त्याचा अर्थ कार्यक्रमाला परवानगी दिली असा सुद्धा होतो.

सभेला उपस्थित वक्त्यांमध्ये मी एक प्रमुख वक्ता होतो. काही दिवसांपूर्वी मी केलेल्या एका ट्विटमुळे भावना दुखावल्या गेल्या असा बनाव करून भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे याने माझ्या सभेला विरोध जाहीर विरोध केला होता. निखिल वागळे पुण्यात आले आणि त्यांनी भाषण केले तर आम्ही ही सभा उधळून लावू' अशा आशयाचे पत्र पर्वती पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी दिल्याचे वृत्त माध्यमांमधून प्रसिद्ध झाले होते. मला वाटले होते की अशी थेट धमकी देणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर पोलीस काहीतरी कारवाई करतील पण संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणाची कोणतीही तमा पोलिसांना आहे असे दिसले नाही.

मी ॲड.असीम सरोदे यांच्या घरी थांबलो होतो तिथे अनेक एसपी दर्जाचे, सिनिअर पीआय, पीएसआय, क्राईम ब्रँच चे अनेक युनिफॉर्म मधील व सिव्हील ड्रेस मधील अधिकारी असीम सरोदे यांच्या घरी साधारणतः 3.30 किंवा 4 वाजताच्या दरम्यान आले असतील. सगळे पोलीस अधिकारी मला हे समजाविण्याचा प्रयत्न करीत होते की मी कार्यक्रमासाठी जाऊच नये. माझे म्हणणे होते की पोलिसांनी धमक्या देणाऱ्यांना अटक करावी आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी होणारा कार्यक्रम होऊ द्यावा इतकेच नाही तर कार्यक्रमाच्या ठिकाणी आम्हाला नेण्यासाठी सुरक्षितता देणे ही पोलिसांची जबादारी आहे. नाहीतर पोलिसांनी मला लेखी द्यावे की मी जाऊ नये. हे सगळे जवळपास 4 तास सुरू होते तरीही मी व माझे सहकारी पोलिसांना सहकार्य करण्याच्या भावनेतून त्यांचे म्हणणे ऐकून घेत होतो. आमच्या सहकारी ॲड. श्रीया आवले यांनी सगळया पोलीस अधिकाऱ्यांच्या साठी कॉफी केली. अनेक अधिकाऱ्यांनी त्यापूर्वी आमच्या सोबत केळी व सफरचंद असा फलाहार सुद्धा केला. या दरम्यान पोलीस अधिकारी त्यांच्या वरिष्ठांच्या सोबत वारंवार फोन कॉल वरून बोलत होते व सूचना घेत होते.

पोलीस क्लिअरन्ससाठी आम्ही तीन ते चार तास वाट बघितली. नंतर संध्याकाळी 7 वाजता मात्र मी पोलीसांना सांगितलं की एकतर आम्हाला अटक करा नाही तर सभेला जाऊ द्या. आम्ही सगळे पायऱ्या उतरून खाली आलो आणि बघितले की साध्या वेशातील व पोलीस ड्रेस मधील तब्बल 50 पोलीस असीम सरोदे यांच्या वर्षा अपार्टमेंटच्या खाली थांबले होते. आम्ही उतरताच ते सगळे अश्या पद्धतीने जमले की आम्ही

Scanned with ACE Scanner

कुठेच जाऊ नये, आमची बेकायदेशीर अडवणूक पोलिसांनी केली. आम्हाला पोलिसांनी बेकायदेशीर अटकाव करून थांबवून ठेवले हे आमच्या लक्षात आले त्यामुळे मी ठरवले की आपण आता कार्यक्रमाला गेलो पाहिजे. पोलिसांच्या सांगण्यानुसार आम्ही जाण्यापूर्वी कार्यक्रम सुरू करावा असे आम्ही कळवले होते. पोलीस कुणाच्यातरी सांगण्यावरून वागत आहेत हे सुद्धा दिसत होते.

मी पोलिसांना सांगितले की आम्ही तुम्हाला सगळे सहकार्य केले पण पोलिसांच्याकडून मात्र आम्हाला संरक्षण देणे, त्यासाठी त्यांचे काही नियोजन असणे, पोलिसांच्याकडे काही उपाययोजनांचा प्लॅन असणे असे काहीही नव्हते व आम्हाला जाऊ न देणे इतकाच त्यांचा उद्देश होता.

पोलिसांनी आम्हाला एका शब्दाने म्हटले नाही की ते आम्हाला संरक्षण देतील किंवा पोलिसांनी असेही म्हटले नाही की निखिल वागळे यांना पोलीस स्वतःच्या गाडीत सभास्थानी नेतील. पोलिसांनी आम्हाला कधीच कोणत्या मार्गाने जायचे असे सांगितले नव्हते किंवा त्यांनी आम्हाला मार्ग आखून दिलेला नव्हता.

आम्ही मी म्हणजे (निखिल वागळे), अॅड. असीम सरोदे,अॅड. श्रीया आवले व डॉ. विश्वंभर चौधरी असे चारजण आणि आमची कार चालवणारा वैभव कोठुळे-पाटील असे दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री साडेसातच्या सुमारास आम्ही अॅड. बाळकृष्ण निढाळकर यांच्या MH 12 JM 5566 या स्विफ्ट कारने सभास्थानी जाण्यासाठी निघालो.अॅड. बाळकृष्ण निढाळकर दुसऱ्या इनोव्हा कारमधून आमच्या सोबत निघाले. आणि एक चांगली गोष्ट म्हणजे आमच्या मागे साध्या वेशातील क्राईम ब्रँच चे 8 ते 9 पोलीस अधिकारी असलेली सुमो कार होती आणि एका चॉकलेटी रंगाच्या कारमध्ये क्राइम branch यूनिट 1 चे अधिकारी सुद्धा काही काळ होते.

आम्ही प्रभात रोडला लागलो आणि काहीतरी गडबड आहे असे लक्षात आले. जात असताना रस्त्यात चार ठिकाणी आमच्या गाडीवर हल्ला केला गेला.

पहिला हल्ला प्रभात रोडला इराणी कॅफेजवळ झाला. मोटार सायकलवर आलेल्या भाजपच्या गुंडांनी आणि त्यांच्या रस्त्यावरच्या साथीदारांनी गाडीवर दगड आणि अंडी फेकली. गल्ली क्र. 4 मध्ये ते दबा धरून बसले होते. आमच्या कारच्या बाजूला ते मोटार सायकलवर होते.

पुढे ज्या ठिकाणी भांडारकर रस्ता कर्वे रस्त्याला मिळतो तेथील राजहंस हेअर सलून जवळ हमला झाला तेव्हा वैभवने गाडी पुढे खंडोजी बाबा चौक डेक्कन कॉर्नर या दिशेने नेली तेथे सिग्नल क्रॉस करताच आमची कार भाजप पक्षाचे व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या कार्यकर्त्यांनी अडवली, ते कार वर चढले, बॉनेट वर चढले, शाई टाकली,कारच्या काचेवर अंडी फोडली, काही साध्या वेशातील पोलीस हातात पोलिसांच्या काठ्या घेऊन या गुंडांना हटविण्याचे प्रयत्न करीत होते पण त्यांनाही हे गुंड ढकलून देतांना आम्हाला कारच्या आतून दिसत होते. प्रभात रोड जिथं कर्वे रोडला जोडतो तिथं भाजपाचे 25-30 गुंड उभे होते. त्यांनी आमची कार अडवून गाडीवर काठ्या आणि रॉड मारत काचा फोडायला सुरूवात केली. पोलीसांची व त्यांची धुमश्चक्री झाली. साध्या वेशातल्या पोलीसांवरही भाजपचे हे गुंड हात चालवत होते हे आम्ही बघत होतो. दरम्यान कारच्या समोर धुमश्चक्री होत होती म्हणून काही पोलीसांनी आम्हाला गाडी रिवर्समध्ये घ्यायला लावली. पोलिस या घटनेचे शूटिंग सुद्धा करीत होते.

त्याच वेळी पोलिसांनी आम्हाला सांगितले की गाडी मागे न्या व कर्वे रस्त्याने जावे असे ते सांगत होते त्यामुळे वैभवने रिव्हर्स गिअर टाकला. तेव्हा राघवेद्र बापू मानकर नावाचा गुंड कारच्या आडवा आला पण वैभवने कार सरळ नेली व बापू मानकर याने ड्रायव्हर साईडचा मिरर तोडला. कार वळवून आम्ही कर्वे रस्त्याने, गरवारे कॉलेज जवळून वळण घेऊन एसएम जोशी हॉल च्या दिशेने निघालो परंतु तेथे ट्रॅफिक जाम असल्याने आम्ही वैकुंठातून कार घातली व तेथून लाल बहादूर शास्त्री रस्त्याकडे निघालो आमच्या मागे साध्या वेशातील पोलीस होते.

Scanned with ACE Scanner

आमचा बहादूर साथी अ‍ॅड. बाळकृष्ण निढाळकर रस्त्यावर गाडी समोर धावत होता आणि गाडी कुठून घ्यायची ते सांगत होता. त्याच सूमाराला आमची गाडी पुढे आणि मागे साध्या वेशातल्या पोलीसांची गाडी असा प्रवास सुरू झाला होता पण पोलिसच गुंडांना मदत करतायेत व गुंडांना फ्री हँड देत होते असे आम्हाला जाणवले.

थोडे पुढे म्हणजे लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर पुन्हा आमच्यावर प्राणघातक हल्ला झाला. इथे सुरूवातीला आमच्या कार समोर माजी आमदार योगेश टिळेकर आणि गणेश घोष झोपले व त्यावेळी प्रशांत जगताप यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना उचलून बाजूला केले. आमची कार पुढे मांगिरबाबा चौकातून दांडेकर पूलाच्या दिशेने जात असतांना दत्ता सागरे, स्वप्नील नाईक, राहुल पायगुडे,गिरीश मानकर यांनी इतरांच्या मदतीने गाडी अडवली. दत्ता सागरे, स्वप्नील नाईक यांनी गाडीवर लाठा मारल्या आणि दगडफेक केली. पुढच्या बाजूच्या काचेवर एक मोठा दगड किंवा पेवर ब्लॉक टाकला, आमची कार मागून फोडण्यात आली आणि नंतर काहीजण आम्हाला इजा करण्यासाठी फुटलेल्या काचेतून रॉड, काठ्या घालण्याचे प्रयत्न करीत होते. त्यावेळी तेथे माजी महापौर राष्ट्रवादी कांग्रेस मूळ पक्षाचे प्रशांत जगताप, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, शिवसेनेचे सुनील मोरे, गजानन थरकुडे आणि ओरिजनल शिवसैनिक राहुल डंबाळे यांचे कार्यकर्ते,आंबेडकरी कार्यकर्ते, युवक क्रांती दलाचे जांबुवंत मनोहर असे कार्यकर्ते आमच्या कार वरील हमला रोखण्याचे प्रयत्न करीत होते. आमचा एक सहकारी अ‍ॅड. बाळकृष्ण निढाळकर जीव धोक्यात घालून आमच्या कार च्या पुढे धावत होता तर एक रणरागिणी मुलगी भक्ती कुंभार आम्हाला रक्षण देऊन रस्ता क्लिअर करीत व गुंडांना आमच्या कार जवळ येण्यापासून रोखत होती. तिला सुद्धा राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजप च्या गुंडांनी मारहाण केली असे नंतर व्हिडिओ बघून दिसले. तसेच श्रद्धा जाधव, ऋतुजा देशमुख, रूपाली शिंदे, पारुल चव्हाण या आमचा बचाव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलींवरही या गुंडांनी हल्ला केला व त्यांना जखमी केले.

हा हल्ला मला जीवे मारण्यासाठी होता व हा दहशतवादी हल्ला होता, प्राणघातक होता. परंतु त्यातून बचावून आम्ही सर्वजण सभास्थानी पोचलो. ठरल्याप्रमाणे मी माझे भाषण केले.

हल्ल्यानंतर भाजपचा गुंड धीरज घाटे यांनी ट्विट करून आपला हेतू सफल झाल्याचे जाहीर केले. जर सभेच्या दोन दिवस आधी 'सभा उधळून देऊ' असे पत्र पोलिसांना गुंड धीरज घाटे याच्यातर्फे दिले गेले होते तर पत्र देणाऱ्यांवर **तेव्हाच** कारवाई का झाली नाही असा प्रश्न येथे उपस्थित होतो. तसेच शिवम बालवडकर नावाच्या गुंडाने सुद्धा त्याच्या फेसबुकवरून मला धमक्या दिल्या आहेत.

आजवर निर्भय बनो चळवळीच्या सुमारे चाळीस सभा झाल्या आहेत. सिन्नर येथील सभेचा अपवाद वगळता सर्व सभा अतिशय शांततेत पार पडल्या आहेत.

आमच्या कारने वाट काढत शेवटी साने गुरूजी स्मारकात गाठले. तिथं शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर आमची वाट पहात होते. आम्ही पोचल्यावर त्यांनी महात्मा गांधी की जय, बाबासाहेब आंबेडकर की जय अशा घोषणा दिल्या.

भाजपा, अभाविप, पतीत पावन संघटना, राष्ट्रवादी कोंग्रेस अजित पवार गटाच्या गुंडांचा हा रस्त्यावरचा थरार आम्ही साधारणत पंचवीस मिनिटं अनुभवला. आपण मेल्यात जमा आहोत असं तीन प्रसंगी वाटलं. कल्पना करा की चाळीस ते पन्नास पेक्षा जास्त लोक वेगवेगळ्या ठिकाणी काठ्या, रॉड, दगड, विटा घेऊन पाच जणांचा पाठलाग करत आहेत. भाजपाच्या गुंडांनी रस्त्यावर दहशत निर्माण केली. आसपासचे लोक भयचकित होऊन हा राडा पहात होते. रस्त्यावर इतरही आयाबहिणी असतांना हे भाजपाचे गुंड माझ्या नावाने अर्वाच्य शिव्या जोरजोरात देत होते. 'वागळयाला खाली खेचा' असे सुद्धा जोरजोरात बोंबलत होते. याचाच अर्थ मला कारच्या बाहेर खेचण्यात गुंडांना यश मिळाले असते तर मला त्यांनी जीवंत मारले असते. रस्त्यावर सामान्य माणसं भयभीत होऊन त्यांना जागा करून देत होती. एखाद्या गुंडागर्दीवाल्या सिनेमाचं दृश्य भाजपच्या गुंडांनी सुसंस्कृत पुण्याच्या रस्त्यावर करून दाखवलं.

Scanned with ACE Scanner

दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी 7 ते 8 च्या दरम्यान आमच्या गाडीवर झालेल्या विविध प्राणघातक हल्ल्यात सहभागी असलेल्या सर्वांविरुद्ध जीवे मारण्याच्या उद्देशाने हमला करणे यासाठी आयपीसी कलम 307, कलम 338, पोलिसांच्या .कार्यालयीन कामात अडथळा यासाठी कलम 353, गंभीर गुन्ह्यासाठी कट कारस्थान रचणे यासाठी कलम 120 ब, शस्त्र व जीवघेण्या वस्तुसह हमला करणे यासाठी कलम 149, 147, .148 दंगल घडवून आणणे, 152 दंगल थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांवर हमला करणे तसेच इन्फोर्मेशन टेक्नोलोजी कायदा इतर कलमांच्या नुसार गुन्हा दाख न केला जावा अशी मी मागणी मी या तक्रारीतुन करत आहे.

भाजपाच्या गुंडांनी सुसंस्कृत पुण्याच्या रस्त्यावर पोलिसांच्या देखरेखीत हैदोस घातला. आम्ही कार्यक्रम झाल्यावर परतत असतांना अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीण पाटील यांचा असीमला फोन आला व तुम्ही तक्रार करणार आहात का? असे त्यांनी विचारले. ॲड. असीम सरोदे म्हणाले की तुमचे पोलीस सगळे बघत होते व दखलपात्र गुन्हा त्यांच्या समोर घडला आहे त्यामुळे तुम्ही पोलिसांची तक्रार भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट तसेच अभाविप, पतीत पावन संघटना यांच्या विरोधात घ्या आणि नंतर आमचे स्टेटमेंट नोंदवून घ्या. उदय सामंत यांच्या गाडीवर कुणीतरी पुण्यात एक चप्पल भिरकावून मारली तर ज्या पोलिसांनी जीवे मारण्यासाठीचे कलम 307 लावून गुन्हा नोंदविला त्याच पोलिसांनी आमच्यावर प्राणघातक हल्ला झाला तरी गुन्हेगारांवर जी कलमे लावलीत ती पाहून वाईट वाटले व पोलीस या सगळया प्रकारात गुंडांना सहकार्य करीत होते असे स्पष्ट झाले आहे. मी पत्रकार आहे व माझ्यावर हमला झाला त्यामुळे पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदविणे आवश्यक आहे.
माझ्यावर व माझे निर्भय बनो चे सहकारी ॲड.असीम सरोदे,ॲड. श्रीया आवले, डॉ. विश्वंभर चौधरी असे चारजण आणि आमची कार चालवणारा वैभव कोठुळे-पाटील त ेच ॲड बाळकृष्ण निढाळकर यांच्यावर जीवघेणा हमला करणे,आमची कार फोडणे यासाठी भाजपचा ुंड धीरज घाटे,तसेच राघवेंद्र उर्फ बापू मानकर, दुषांत मोहोळ,दीपक पोटे, दत्ता सागरे, गिरीश मानकर,गणेश घोष, अभिजित राऊत,योगेश श्यांडील्य, स्वप्रील अरुण नाईक, राहुल पायगुडे, योगेश टीळेकर,पुनीत जोशी, प्रमोद करडे, विशाल पवार, प्रतीक देसरडा, गणेश शेरला, मनीष पाडेकर व इतर 200 ते 250 लोकांच्या विरोधात माझी ही फौजदारी तक्रार आहे. वरील सर्वांविरुद्ध जीवे मारण्याच्या उद्देशाने हमला करणे यासाठी आयपीसी कलम 307, कलम 338, पोलिसांच्या कार्यालयीन कामात अडथळा यासाठी कलम 353, गंभीर गुन्ह्यासाठी कट कारस्थान रचणे यासाठी कलम 120 ब, शस्त्र व जीवघेण्या वस्तुसह हमला करणे यासाठी कलम 149, 147, 148 दंगल घडवून आणणे, 152 दंगल थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांवर हमला करणे तसेच कलम 427 गाडी फोडणे इतर कलमांच्या नुसार गुन्हा दाखल करावा, या गुंडांना अटक करावी यासाठी ही तक्रार मी करीत आहे.

**तक्रारदार** -निखिल वागळे

4/ए लिली रोज सोसायटी, मोगल लेन, माहीम, मुंबई-16

माझी पुण्यातील वकिलांची टिम याबाबत पाठपुरावा करेल.

Scanned with ACE Scanner